## भाग दोन

## पोलीस पाटलांनी कर्तव्ये पार पाडण्याबाबत काही व्यवहार्य सूचना

(३९) शा. नि.,गृ.वि., क्र. १८११, दि. १३ मार्च १९०६. (४०) पोलीस नियम पुस्तिका १९५९, खंड तीन, नियम ६८(७). (४१) पोलीस नियम पुस्तिका १९५९, खंड तीन, नियम ६८(८).

१. **गुन्ह्याला प्रतिबंध.—(एक) दुर्जन व संशयित व्यक्तींवर नजर ठेवणे.—** (३९ ते ४१) फौजदाराकडून आपणाला ज्यांच्यावर नजर ठेवावयाची अशा कुप्रसिद्ध दुर्जन व्यक्तींची नावे कळविली जातील. आपण त्यांच्या प्रामाणिक कार्यात अडथळा न आणता त्यांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवाल. ह्या व्यक्तींपैकी कोणी गाव सोडून दुसऱ्या गावात किंवा शहरात रहायला गेल्यास आपल्या पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यास त्यांच्या जाण्याबद्दल आणि त्यांच्या जाण्याच्या अभिकथित ठिकाणाबद्दल तात्काळ कळवणे हे आपले कर्तव्य आहे.

(४२) मुंबई सराईत गुन्हेगार अधिनियम, १९५९ नियम.

**(दोन) सराईत अपराध्यांवरील देखरेख (४२).**—तसेच काही प्रकरणात (तपशिलाकरिता परिशिष्ट क पहा) आपण व्यक्तींची उपस्थिती पहावी आणि मुंबई सराईत गुन्हेगार अधिनियम अन्वये ज्या व्यक्तीबाबत निर्बंधाचा आदेश देण्यात आला असेल अशा प्रत्येकाला पास द्यावा.

(४३) पोलीस नियम पुस्तिका, खंड तीन, १९५९ नियम ६९(७).

**(तीन) संशयित परक्या व्यक्तींवरील देखरेख (४३).**—तुमच्या गावात संशयित परकी व्यक्ती आल्याचे ऐकिवात आल्यास, त्याचे पूर्वचरित्र आणि निवासस्थान यासंबंधी त्या व्यक्तीस प्रश्न विचारणे आणि पोलीस ठाण्यात तिच्याबद्दल ताबडतोब कळवणे हे आपले कर्तव्य आहे. हे कर्तव्य फार महत्त्वाचे आहे.

(४४) पोलीस नियम पुस्तिका तीन, १९५९ ९३ (१).

**(चार) भटक्या टोळ्यांवर देखरेख (४४.)**—भटक्या टोळ्या बहुधा गुन्हेगार असतात. त्या तुमच्या गावात गुन्हे करत नसल्या तरी दुसऱ्या ठिकाणी गुन्हे करण्यासाठी अड्डा म्हणून आपल्या गावाचा उपयोग करू शकतात, किंवा घरफोडी करण्यासाठी सोयीस्कर घरे निवडू शकतात आणि नंतर केव्हा तरी गुप्तपणे परत येऊन घरफोडी करू शकतात किंवा दरवडा घालू शकतात. आपण त्यांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे. कोणत्याही भटक्या टोळीच्या येण्याबद्दल व जाण्याबद्दल पोलीस ठाण्याला आणि पोलीस चौकीला ताबडतोब कळविणे हे

आपले कर्तव्य आहे. टोळीचे वर्णन टोळी-नोंदवहीत लिहावे (नमुना पोलीस नियमपुस्तिका १२७) नोंदवहीतील सर्व स्तंभ फार काळजीपूर्वक भरावे.

(४५) व (४६) गटागटातील वितुष्टे, गटागटातील भांडणे आणि वाद, सलोख्याने मिटवण्यासाठी आपण जास्तीतजास्त प्रयत्न करावे. परंतु पक्षांनी आपसातील मतभेदाबाबत तडजोड करण्याचे नाकारले आणि शांतता भंगाचा धोका वाटत असल्यास आपण फौजदाराला आगाऊ इशारा देऊन ठेवावा आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १०७ अन्वये संबंधित व्यक्तींना ताब्यात घेण्यासाठी पुरावा गोळा करण्यास त्याला मदत करावी.

(४५) शा. नि, गृ. वि, क्र. ४१०५, दि. २४ जानेवारी १९२४.
(४६) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १०७.

**(पाच) रात्रीची गस्त.**—(४७) व (४८) संशयास्पद रीतीने फिरणाऱ्यांना पकडण्यासाठी आणि घरफोडी, चोऱ्या यांना आळा घालण्यासाठी रात्रीच्या वेळी गस्त घालणे व आपल्या ग्राम पोलिसांच्या रात्रीच्या गस्तीवर देखरेख करणे हे आपले कर्तव्य आहे. दरोडेखोर आपल्या गावाच्या जवळपास आहेत असे कळले तर दरोडेखोरांचे हल्ले परतून लावण्याच्या दृष्टीने पुरेशा लाठ्या आणि दगड घेऊन काही गावकऱ्यांना चावडीत आळीपाळीने झोपावयला आपण प्रवृत्त करावे.

(४९) रात्रीची गस्त घालण्याच्याबाबतीत पोलीस पाटील कसूर करीत नाहीत आणि आवश्यक असेल तेव्हा कोतवाल त्यांना सोबत करतात याची खात्री करून घेण्यासंबंधी सर्व जिल्हा दंडाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. (शासकीय परिपत्रक, गृहविभाग, क्रमांक वीव्हीपी. २४६२/१२११२-सहा, दिनांक १० ऑगस्ट १९६५ पहावे.)

(४७) मुंबई शासन राजपत्र, असाधारण, भाग सात, जुलै १९१२, पृष्ठ ४५५ उतार ९ (जी).
(४८) पोलीस महानिरीक्षक क्र. ३८४९, दि. १४ मे, १९०६.

**(सहा) आंदोलन करणारे, वक्ते, सभा इत्यादी.**—जर काही आंदोलन करणाऱ्यांनी किंवा धर्मवेड्यांनी आपल्या गावाला भेट देऊन सभा घेतल्या, भाषणे केली किंवा किर्तने किंवा परिसंवाद या चर्चासत्र आयोजित करून आपल्या गावातील शांतता भंग करण्याच्या हेतूने लोकांना उघड उघड अथवा गुप्तपणे एखादी गोष्ट करण्याची चिथावणी दिली अथवा जातीय द्वेष, घबराट, अविश्वास किंवा मनःक्षोभ भडकण्याची शक्यता असलेल्या अफवा पसरवल्या तर आपण आपल्या फौजदाराला त्याच्या आगमनाबाबत आणि त्यांच्या वर्तणुकीबाबत माहिती कळवावी आणि ते आपला गाव सोडून जाईपर्यंत त्यांच्यावर नजर ठेवावी.

२. **गस्तक्षेत्रातील कर्तव्यस्थ पोलीस शिपायांना सहाय्य.**—जेव्हा गस्त क्षेत्रातील कर्तव्यस्थ पोलीस आपल्या गावात येतील तेव्हा आपण आपल्या गावातील घटनासंबंधीची, तसेच दुष्प्रवृत्त व्यक्ती आणि त्यांना भेटणाऱ्या व्यक्ती, गुन्हेगार जमाती, परक्या आणि संशयित व्यक्ती यांच्या वर्तणुकीसंबंधीची (ही माहिती गस्तक्षेत्र कर्तव्यस्थ पोलीसांची वाट न पाहता तावडतोब देण्यात यावी) आणि त्याप्रमाणे तपास न लागणारा गुन्हा आणि एखादी सभा अथवा गावातील आंदोलन याबाबत गावातील अफवा या सर्व गोष्टींसंबंधीची आपल्याला असलेली संपूर्ण माहिती त्यांना द्यावी.

गस्त घालणाऱ्या पोलिसांच्या गस्त पुस्तकात आपणाला प्रतिस्वाक्षरी (सही) करावी लागेल आणि तो आपल्या भेट नोंद पुस्तकात नोंद करील. गस्त क्षेत्रातील पोलीस गावात असतानाच गावातील भेट नोंद पुस्तकात नोंद करील याची आपण खात्री करून घ्यावी आणि कोणत्याही सबबीवर भेट नोंद पुस्तक भरण्याकरिता अन्य ठिकाणी किंवा चौकीवर पाठवू नये. त्याचप्रमाणे, पोलीस शिपायाने केलेली नोंद वाचल्याशिवाय गस्त-पुस्तकात आपण प्रतिस्वाक्षरी (सही) करू नये. ती नोंद खरी असल्यासच, आपण त्या नोंदीच्या खाली जागा न सोडता आपली सही करावी. गुन्ह्यांशी मुकाबला करण्याच्या आणि शांतता आणि सुव्यवस्था राखण्याच्या बाबतीत आपण पोलिसांचे साथी आहात, परंतु पोलीस स्वत:च्या कर्तव्यात कसूर करत असता आपण त्यांना पाठिंबा द्यावा असा याचा अर्थ नाही, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. स्वखर्चाने अथवा गावकऱ्यांच्या खर्चाने कोणत्याही दर्जाच्या पोलीस कर्मचाऱ्याला आपण कोणतीही वस्तू पुरवण्याची आवश्यकता नाही. उलट, ते ज्या वस्तु घेतील त्याकरिता बाजारातील नेहमीच्या किमतीनुसार त्यांच्याकडून पैसे घ्यावे. जेव्हा पोलीस तपासणीचे काम प्रामाणिकपणे करत असतील तेव्हा आपण त्यांचे आदेश पाळले पाहिजे. परंतु त्यांची तपासणी अप्रामाणिक असल्याचे आपणास ठाऊक असल्यास, खोट्या पंचनाम्या-वर सही करून किंवा अन्य प्रकारे आपण त्यांना मदत करू नये. उलट, आपण ताबड-तोब वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना कळवावे. आपली स्वत:ची वर्तणूक जर सरळ-असेल तर ते आपणास खात्रीने पाठिंबा देतील. आपण आणि आपले ग्रामपोलीस आपल्या गावातील अप्रामाणिक तपासणीला आळा घालू शकतात हे लक्षात ठेवावे.

(५०) महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम, १९६७ चे कलम १४.

३. **गुन्हा घडल्यानंतरची कर्तव्ये.**—(५०) बऱ्याच वेळा तक्रार करणाऱ्या व्यक्ती, अतिरंजित, दिशाभूल करणाऱ्या चुकीच्या अथवा खोट्या तक्रारी करतात. म्हणून तक्रार होताच पहिली करावयाची गोष्ट म्हणजे गुन्हा घडलेल्या स्थानाची पहाणी करणे आणि ज्यांना परिस्थितीची माहिती असण्याची शक्यता उघड आहे अशा, तेथे उपस्थित असलेल्या लोकांकडे चौकशी करणे आणि अशा रीतीने ग्राम पोलीस अधिनियमाच्या कलम १४ अन्वये आरोपीला पकडणे आणि त्याला पुराव्यासहित फौजदाराकडे पाठविणे ही कारवाई करावी किंवा कसे यासंबंधी निर्णय घेण्यास स्वत:ला शक्य व्हावे ही होय. ह्या प्रारंभिक चौकशी-मुळे आपणास गुन्ह्याच्या सत्यतेची आणि गांभिर्याची कल्पना येईल आणि त्या चौकशीत आपला तास दोन तासांहून अधिक वेळ कधीच खर्च होणार नाही. आपण संपूर्ण चौकशी करावी असा हेतू नाही. तक्रार दिशाभूल करणारी नाही किंवा अपराध्यांना निसटून जाता येणार नाही याची निश्चिती करण्यासाठी आपण तत्परतेने उपाय योजून साधे व्यवहारज्ञान असलेली कोणतीही व्यक्ती करील अशी साधीसुधी ठळक चौकशी फक्त करावी.

खालील दोन उदाहरणांवरून हे स्पष्ट होईल :—

## उदाहरणे

**उदाहरण क्रमांक १.**—मन:क्षोभ झालेला एखादा तरुण आपल्याकडे येईल आणि स्वत:चे वडील ठार झाले असे सांगेल, परंतु त्या घटनास्थळी जाताना रस्त्याने आपणास खोच काढून येईल की, त्यांचे फक्त भांडण झाले होते आणि

संबंधित व्यक्तीच्या फक्त नाकाला इजा झाली होती. ते रक्त पाहून मुलगा घाबरला आणि तो खुनाचा आरोप घेऊन आपणाकडे आला. वस्तुस्थिती काय आहे हे शोधून काढण्यास आपणाला फारसा वेळ लागणार नाही . ती आपण आपल्या प्रतिवृत्तात स्पष्ट करू शकाल आणि अशा रीतीने आपण दिलेले प्रतिवृत्त खरोखर महत्त्वाचे ठरेल. काही मिनिटांच्या चौकशीअंती, आपणाला कळून येते की, केवळ एक क्षुल्लक अदखली अपराध घडला आहे. अशावेळी आपण प्रतिवृत्तात खून झाल्याची नोंद करणे किती हास्यास्पद ठरले असते ते आपणाला कळून येईल.

**उदाहरण क्रमांक २.**—"दरोडेखोरांनी माझ्या घरावर हल्ला केला आहे, ते घरातील लोकांना मारहाण करून मालमत्तेची लूट करीत आहेत आणि मी कसाबसा मागच्या दाराने निसटलो" असे एखादा इसम मध्यरात्री आपल्याकडे धावत येऊन सांगतो अशा वेळी तक्रार लिहून घेणे आणि त्याचे प्रतिवृत्त फौजदाराकडे पाठवून या गोष्टीत आपण वेळ घालवणे हास्यास्पद ठरेल. अशावेळी गोळा करणे शक्य असेल तितकी माणसे घेऊन आपण घटनास्थळी तावडतोब गेले पाहिजे आणि दरोडेखोरांना घटनास्थळीच पकडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अथवा त्यांचा पाठलाग करून ते फार दूर जाण्यापूर्वी त्यांना पकडले पाहिजे. हे सर्व केल्यानंतर आपण आपले प्रतिवृत्त पाठवावे. अर्थात सर्व गोष्टी परिस्थितीवर अवलंबून असतात आणि आपण थोडाबहुत विचार केलाच पाहिजे. जर दरोडेखोरांची संख्या इतकी जास्त असेल की, गावकऱ्यांच्या मदतीने आपण त्यांच्याशी टक्कर देऊ शकत नसाल तर आपणास एका माणसाला पोलीस मदतीसाठी पाठवावे लागेल. परंतु अशा प्रकरणांत पोलीस येण्याच्या बराच वेळी आधीच दरोडेखोर कित्येक मैल लांब पळून गेलेले असतील, हे आपण ध्यानात ठेवले पाहिजे. आपण अशा प्रकरणांत किती तत्परतेने कार्यवाही करू शकता त्यावर कार्यवाहीचे यश अवलंबून राहील.

**४. तक्रारींची नोंद करणे.**—ज्या व्यक्तींनी प्रथमत: आपणाकडे तक्रार केली असेल अथवा खबर दिली असेल अशा व्यक्तींची निवेदने आपण काळजीपूर्वक नोंदविली पाहिजेत. कारण ती निवेदने पुढील कार्यवाहीसाठी संबंधित पोलीस ठाणे अंमलदाराकडे पाठवावयाची असतात. तक्रार करणाऱ्याने जे स्वत: पाहिले असल्याचे सांगितले ते आणि इतर कोणी त्याला जे सांगितले अथवा जे त्याने ऐकले ते या दोहोंमध्ये आपण बारकाईने फरक केला पाहिजे. (बऱ्याच वेळा तक्रार करणारा निव्वळ खबऱ्या असतो, त्याला प्रत्यक्ष माहिती नसते) जर व्यथित व्यक्ती आणि माहिती देणारा एकास्थळी उपलब्ध असतील तर केवळ माहिती देणाऱ्याच्या ऐकीव निवेदनापेक्षा व्यथित व्यक्तीच्या निवेदनाचीच तक्रार म्हणून नोंद करावी. म्हणजेच जर एखादा मनुष्य त्याच्या पत्नीसह आपल्याकडे आला आणि त्याच्या अनुपस्थितीत स्त्रियांवर हात टाकण्याचे असभ्य वर्तन कोणीतरी केल्याचे सांगू लागला तर त्या स्त्रीला वस्तुस्थितीची पूर्ण माहिती आहे आणि पुरुष केवळ त्याने जे ऐकले ते सांगत आहे हे उघड आहे. ती स्त्री हीच व्यथित व्यक्ती असल्यामुळे तिची तक्रार नोंदावी, जर व्यथित व्यक्ति उपलब्ध नसेल तर माहिती देणाऱ्याला आपण

फिर्यादी समजावे. सत्य परिस्थिती जाणून घेण्यासाठी आवश्यक असे प्रश्न आपण माहिती देणाऱ्यास किंवा तक्रार करणाऱ्याला विचारावे आणि ह्या व्यक्तिला खरोखर किती माहिती आहे आणि खरोखर तिला काय म्हणायचे आहे ह्याची नोंद घेण्याची काळजी घ्यावी. हे पहिले निवेदनच संपूर्ण अन्वेषणाचा पाया आहे ह्याची आठवण ठेवावी. न्यायालय त्याला सर्वांत जास्त महत्त्व देतात आणि ते नंतरच्या कोणत्याही फेरबदलांना मान्यता देण्यास किंवा त्यावर भरवसा ठेवण्यास नाखूष असतात. म्हणून ह्या बाबतीत आपण अतिशय काटेकोर असले पाहिजे.

५. **पहिल्या माहितीचा अहवाल पाठवणे.**—ह्या प्राथमिक कार्यवाहीनंतर आपण आपल्या पहिल्या माहितीचा अहवाल महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियमाच्या कलम १२ खाली "पोलीस नियम पुस्तिका १२८" या विहित नमुन्यामध्ये तत्परतेने तयार करून पाठवला पाहिजे. असे करताना प्रतिवेदित गुन्ह्याचे खरे स्वरूप निश्चित करण्यासाठी आवश्यक त्यापेक्षा जास्त वेळ आपण घालवत नाही याची खात्री करून घ्यावी. हा नमुना भरण्यापूर्वी आपल्या मार्गदर्शनाकरिता नमुना पुस्तकाच्या मुखपृष्ठावर छापलेल्या सूचना आणि खुद्द नमुन्यावरील सूचना देखील आपण फार काळजीपूर्वक वाचल्या पाहिजेत आणि त्या काटेकोरपणे अमलात आणल्या पाहिजेत. कोणतेही उत्तर लिहिण्यापूर्वी आपण प्रत्येक प्रश्न वाचून आणि समजून घ्यावा आणि नंतर मोकळ्या जागेत अचूक उत्तर लिहावे. पाठवावयाची स्वच्छ प्रत आपण ठेवता या कार्यालयीन प्रतीची हुबेहूब नक्कल असल्याचे नीट व अतिशय काळजीने तपासून घ्या आणि आपणास माहित असलेल्या प्रकरणाचा अधिक तपशील (प्रश्नमालिकेत आलेला तपशील सोडून) आपण नमुन्याच्या दर्शनी बाजूवर लिहावा आणि फिर्यादीचे निवेदन किंवा पंचनामा किंवा मृत्युकालीन कथन किंवा इतर कागदपत्र यांसारखी कोणती जादा कागदपत्रे आपण जोडली असतील ते नमूद करण्याची खास काळजी घ्या. प्रकरणाबाबतची वस्तुस्थिती काय असावी, आरोपी कोण आहे व साक्षीदार कोण कोण आहेत हे सर्व आपल्या अहवालावरून स्पष्ट झाले पाहिजे. आपण आपल्या संदेशवाहकाला अहवालाची पोच पावती आणण्यास आग्रहाने सांगावे. ही पोचपावती नमुन्याच्या मागील बाजूस तळाशी असलेल्या मोकळ्या जागेत कार्यालयीन प्रतीस जोडावी.

फौजदारी प्रक्रिया संहितेतील अटक करण्याबाबतच्या कलमाचा सारांश आपल्या माहितीकरीता खाली उधृत केला आहे :—

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४६.

(१) अटक करताना तसे करणारा पोलीस अधिकारी किंवा अन्य व्यक्ती, अटक करावयाच्या व्यक्तीने किंवा कृतीन स्वाधीन होण्याची तयारी दर्शविली नाही तर तिच्या शरीरास प्रत्यक्षपणे स्पर्श करील किंवा त्यास परिरुद्ध करील.

(२) जर अशा व्यक्तीने स्वतःस अटक करावयाच्या प्रयत्नाच्या बळाने प्रतिकार केला किंवा अटक चुकवण्याचा प्रयत्न केला तर, असा पोलीस अधिकारी किंवा अन्य व्यक्ती, अटक करण्यासाठी जरूर त्या त्या सर्व साधनांचा अवलंब करू शकेल.

ज्या व्यक्तीने त्याने केलेल्या अपराधाबद्दल त्यास फाशीची अथवा आजन्म कारावासाची शिक्षा होणार नसेल तर त्या व्यक्तीस अटक करताना ती व्यक्ती मरण पावेल अशा तऱ्हेने बळाचा वापर करण्याचा अधिकार या कलमाने मिळू शकत नाही.

जर अटकेच्या अधिपत्राखाली (वॉरंट) कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा अटक करावयाचा प्राधिकार असलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला, अटक करण्यास पात्र असणाऱ्या व्यक्तीने कोणत्याही एखाद्या स्थळी प्रवेश केलेला आहे किंवा ती तेथे आहे असे समजण्यास आधार असेल तर अशा स्थळी राहणारी किंवा त्या स्थळाचा ताबा असणारी कोणतीही व्यक्ती पूर्वोक्त कार्य करणाऱ्या व्यक्तीने किंवा पोलीस अधिकाऱ्याने मागणी केल्यास तिला/त्याला तेथे मुक्त प्रवेश देईल व तेथे झडती घेण्यासाठी सर्व वाजवी सोयी उपलब्ध करून देईल.

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४७.

जर कलम ४७ च्या पोट-कलम (१) खाली अशा स्थळी प्रवेश मिळू शकला नाही तर अधिपत्राखाली (वॉरंट) कार्य करणाऱ्या व्यक्तीने व ज्या प्रकरणी अधिपत्र निघू शकेल पण अटक करावयाच्या व्यक्तीला निसटण्याची संधी मिळू दिल्याशिवाय ते प्राप्त करता येत नसेल अशी कोणत्याही प्रकरणी, पोलीस अधिकाऱ्याने अशा स्थळी प्रवेश करणे व तेथे झडती घेणे आणि आपल्या प्राधिकाराची व प्रयोजनाची सूचना देऊन प्रवेश देण्याची रीतसर मागणी केल्यानंतर त्याला अन्य प्रकाराने प्रवेश मिळू शकत नसेल तर अशा स्थळी प्रवेश मिळविण्यासाठी कोणत्याही घराचे किंवा जागेचे मग ती अटक करावयाच्या व्यक्तीची असो वा अन्य कोणत्याही व्यक्तीची असो बाहेरील किंवा आतील दार किंवा खिडकी फोडून उघडणे कायदेशीर असेल :

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४८.

परंतु असे स्थळ म्हणजे रूढीनुसार जी लोकांसमोर येत नाही अशा स्त्रीच्या (ती अटक करावयाची व्यक्ती नसता) प्रत्यक्ष ताब्यात असलेले दालन असेल तर अशी व्यक्ती किंवा पोलीस अधिकारी अशा दालनात प्रवेश करण्यापूर्वी अशा स्त्रीला निघून जाण्याची (To withdraw) तिला मोकळीक आहे अशी सूचना देऊन निघून जाण्यासाठी हर प्रकारची वाजवी सोय तिला उपलब्ध करून देईल व नंतर त्याला ते दालन फोडून उघडता येईल व त्यात प्रवेश करता येईल.

अटक करण्यास प्राधिकृत असा कोणताही पोलीस अधिकारी किंवा अशी अन्य व्यक्ती अटक करण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही घरात किंवा जागेत कायदेशीरपणे प्रवेश करून त्यात अडकून पडलेल्या स्वतःची किंवा अशा अन्य कोणत्याही व्यक्तीची सुटका करण्यासाठी, त्याचे बाहेरील किंवा आतील दार किंवा खिडकी फोडून उघडू शकेल.

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४७ (३).

अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला ती निसटून जाण्यास प्रतिबंध करण्यास जरूर असेल त्याहून अधिक निरोध सोसावयास लावले जाणार नाही.

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४९.

फौजदारी प्रक्रिया संहिता ५१.

ज्या अधिपत्रात जामीन घेण्याबाबत तरतूद केलेली नाही त्या अधिपत्राखाली पोलीस अधिकाऱ्याने एखाद्या व्यक्तीला अटक केलेली असेल अथवा त्या अधि-पत्रात जामीन घेण्याबाबत तरतूद केलेली आहे त्याखाली तिला अटक केली असेल, पण अटक झालेली व्यक्ती जामीन देऊ शकत नसेल आणि,

जेव्हा जेव्हा एखाद्या व्यक्तीला अधिपत्राशिवाय किंवा खाजगी व्यक्तीने अधिपत्राखाली अटक केलेली असेल व त्या अटक झालेल्या व्यक्तीला जामीनादेश देणे कायद्यानुसार शक्य नसेल किंवा ती जामीन देण्यास असमर्थ असेल तेव्हा, अटक करणाऱ्या अधिकाऱ्याला, किंवा जेव्हा अटक खाजगी व्यक्तीने केली असेल तेव्हा तिने अटक केलेल्या व्यक्तीला ज्या पोलीस अधिकाऱ्याच्या स्वाधीन केले असेल त्याला अशा अटक केलेल्या व्यक्तीची झडती घेता येईल व तिच्या अंगावर सापडणाऱ्या जरूर त्या घालावयाच्या कपड्याव्यतिरिक्त अन्य सर्व वस्तू सुरक्षित अभिरक्षेत ठेवता येतील.

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ५१(२).

ज्यावेळी एखाद्या स्त्रीची झडती घ्यावयाची असेल तेव्हा तिची झडती दुसऱ्या स्त्रीकडून घेतली जाईल व त्यात योग्य ते औचित्य काटेकोरपणे राखले जाईल.

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ५२.

एखादा अधिकारी किंवा इतर व्यक्ती, या संहितेखाली कोणत्याही प्रकारची अटक करताना, अटक केलेल्या व्यक्तीकडून तिने बाळगलेले कोणतेही मारक शस्त्र काढून घेईल. आणि ज्या न्यायालयासमोर किंवा अधिकाऱ्यासमोर अटक केलेल्या व्यक्तीला हजर करणे या संहितेप्रमाणे आवश्यक असेल त्या न्यायालया-समोर किंवा अधिकाऱ्यासमोर अशी काढून घेतलेली सर्व शस्त्रे सादर करील.

(५४) महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम, कलम १४.

६. **आरोपीला अटक करणे (५४).**—आरोपीला तात्काळ अटक करणे आपणास शक्य असेल आणि गुन्हा गंभीर स्वरूपाचा असेल किंवा गुन्हेगार फरारी होण्याची शक्यता असेल तर आपण महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियमाच्या कलम १४ अन्वये आरोपीला अटक करावी आणि त्याला २४ तासांच्या आत पोलीस ठाण्याकडे रवाना करावे.

(५५) महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम, कलम १२.

७. **पुढील चौकशी (५५).**—आपल्या गावाच्या हद्दीत एखादा गुन्हा घडला व गुन्हेगार जर पळून गेला असेल अथवा माहीती नसेल तर आपण त्याबद्दलची माहिती पोलीस ठाणे अंमलदारास तात्काळ देऊन गुन्ह्याच्या तपासासाठी जाऊन आवश्यक असा पुरावा मिळवावा व त्याची पुढील माहिती ठाणे अंमलदारास पाठवावी.

८. **मृत्यूकालीन कथन.**—आपण साक्षीदार गोळा करावे, पुरावा मिळतो का ते पहावे, आणि पुरावा नोंदवावा. दुर्वर्तनी व्यक्ती किंवा संशयित व्यक्ती गुन्ह्याच्या वेळी कोठे होत्या, तक्रार करणाऱ्याचे काही शत्रू आहेत काय याची माहिती मिळवावी. आणि खून झाला असल्याचे त्याचे कारण कोणते असेल, आणि त्यामुळे कोणाला फायदा होण्यासारखा आहे यासंबंधी म्हणजेच थोडक्यात

आपल्या स्थानिक माहितीच्या आधारे अशा प्रकारची सर्व कार्यवाही करावी की जेणेकरून गुन्ह्याचा तपास लावण्याची आणि गुन्हेगाराला अटक करण्याची शक्यता निर्माण होईल, आणि चौकशीचे काम पूर्ण होईपर्यंत पोलिसांना सर्व प्रकारची मदत करणे चालू ठेवावे.

एखाद्या व्यक्तीला दुखापत झाली असेल आणि ती व्यक्ती मरण्याची शक्यता असेल आणि आपल्या हातातील सर्व अधिकार वापरून तिला जगविण्याचे आपले सर्व प्रयत्न करून झाल्यानंतर संबंधित व्यक्तीचे मृत्युकालीन कथन शक्य असल्यास दोन स्वतंत्र साक्षीदारांच्या समक्ष नोंद करून घ्यावे आणि अभिकथित आरोपी उपलब्ध असेल तर त्याच्या समक्षही हे कथन नोंदावे. त्या मरणोन्मुख स्थितीत असलेल्या माणसाला हल्ला कसा, कोठे व का करण्यात आला व त्याच्यावर हल्ला करणारे कोण होते आणि हल्ला कोणत्या साधनांनी करण्यात आला हे प्रश्न विचारावे. अशा प्रकारचे कथन प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात नोंदवणे उपयुक्त असते आणि हे मृत्युकालीन कथन ज्या साक्षीदारांसमोर नोंदण्यात आले त्यांच्याकडून साक्षांकित करून घ्यावे. त्यानंतर आपण जखमी व्यक्तीस जवळच्या रुग्णालयात औषधोपचारासाठी पाठविण्याची व्यवस्था करावी.

९. **पावलांचे ठसे व इतर पुरावा यांचे जतन करणे.**—गुन्ह्याच्या जागेवरील दृश्य फार महत्त्वाचे असते. कारण त्यायोगे अनेक धागेदोरे मिळू शकतात म्हणून लोक गुन्ह्याच्या स्थळी कोणताही हस्तक्षेप करणार नाहीत किंवा तेथील कोणत्याही वस्तूला मग ती वस्तू कितीही क्षुल्लक वाटत असो हात लावणार नाहीत याबद्दल पोलीस पाटलाने खात्री करून घ्यावी. याकरिता एखाद्या रखवालदाराची नेमणूक करावी किंवा पोलीस पाटलाने जातीने तेथे रहावे.

आपण पावलांचे सर्व ठसे अत्यंत काळजीपूर्वक एखाद्या टोपलीखाली किंवा योग्य अशा इतर साधनाने झाकून ठेवावे आणि पोलीस येईपर्यंत इतर काही खुणा, रक्ताचे डाग, बोटांचे ठसे, सापडलेली साधने किंवा इतर वस्तू यांचे कोणताही हस्तक्षेप न करता किंवा त्या मोडणार नाहीत अशा रीतीने जतन कराव्यात.

११. **बेलिफांना मदत.**—पोलीस पाटलांनी बेलिफांना त्यांची शासकीय कर्तव्ये पार पाडण्याबाबत सर्व प्रकारची मदत द्यावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत. (शासकीय परिपत्रक, गृह विभाग, एमआयएस-१०६४/९९३१४-सहा, दिनांक ३ जुलै १९६५).

११. **प्रामाणिकपणा, तत्परता आणि हुशारी.**—पण आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, कोणत्याही परिस्थितीत आपली कृती अगदी प्रामाणिकपणाचीच असली पाहिजे आणि आपण एकाविरुद्ध दुसऱ्याची बाजू घेता कामा नये, आपण आपल्या शत्रूंना केवळ त्यांचे व आपले संबंध बरे नाहीत म्हणून एखाद्या प्रकरणात गोवता कामा नये, तसेच एखाद्या प्रकरणात एखादी विशिष्ट व्यक्ती दोषी आहे असे आपणाला वाटते, परंतु तसा पुरेसा पुरावा मिळत नाही, एवढ्याच कारणाने खरा पुरावा मिळत नसताना, ते प्रकरण उचलून धरण्या-

साठी पुराव्याची नोंद करण्याचा अति उत्साह आपण दाखवू नये. थोडक्यात सांगावयाचे तर या सर्व गोष्टींपेक्षा आपण प्रामाणिक असावे, कृतितत्पर असावे आणि अक्कल हुशारीने आणि वर स्पष्ट केलेल्या कायद्याप्रमाणे आपण वागावे.

१२. **कामात दुर्लक्ष केल्याबद्दल शिक्षा.**—जर आपण आपल्या कर्तव्याबाबत निष्काळजीपणा किंवा हयगय करत असाल तर महाराष्ट्र ग्रामपोलीस अधिनियमाच्या कलम नऊ अन्वये आपणाला आपल्या वार्षिक वितलब्धीच्या १/१२ (एक बारांश) इतका दंड केला जाऊ शकतो. अधिक गंभीर स्वरूपाची गैरवर्तणूक झाल्यास आपण निलंबित किंवा पदच्युत होण्यास पात्र ठराल.

१३. (क) पोलीस पाटलाने स्वत: किंवा पोलिसाने गावात अटक केलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या ठावठिकाण्याची आणि निवाऱ्याची योग्य ती सोय पोलीस पाटलाने करावी.

(ख) पोलीस पाटलाने स्वत:च्या अधिकारात अटक केलेल्या स्त्रियांशी आणि मुलांशी काटेकोरपणे औचित्याने आणि वाजवी सौजन्याने वागावे.

(ग) आणिबाणीच्या काळात त्याने रेल्वे मार्ग, पुल, तारमार्ग इ. सार्वजनिक मालमत्तेला पुरेसे संरक्षण दिले जात आहे याबद्दल खात्री करून घ्यावी. याकरता त्याने ग्रामसेवकाबरोबर फेऱ्या माराव्या.

(घ) आगीपासून होणाऱ्या नुकसानीस प्रतिबंध करण्यासाठी सर्वप्रकारे प्रयत्न करावे.

(च) आपण ग्राम सुरक्षा पथकांना आपल्या अखत्यारातील शक्य ती सर्व मदत द्यावी आणि त्यांच्या कार्यात सहकार्य द्यावे.

(छ) न्यायवैद्यकीय प्रकरणांत, अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींसाठी त्याने वैद्यकीय मदत मिळवून द्यावी.

(ज) पोलीस पाटलाने जातीय तणावाची प्रत्येक घटना, जरी ती दखल घेण्याजोगी नसली, तरी पोलीस ठाण्यांना तत्परतेने कळवावी.